# संकरीत गो पैदास प्रकल्प
# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

जा.क्रं.संगोपैप्र/ 1381 /२०२१ दिनांक : ५ /०१/२०२१

## जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, संकरीत गो पैदास प्रकल्प, वनामकृवि, परभणी मा. संचालक संशोधन, वनामकृवि, परभणी यांचे मंजूरी जाक्र. ५५६४/२०२० दि. १०-१२-२०२० नुसार प्रक्षेत्रावरील गट क्र. १,२,३,४,५,६,७,८८ व ८९ मधील असे एकुण ६६.६८ हेक्टर चराऊ क्षेत्र असुन सध्या सदरील क्षेत्रामध्ये बाभळीचे झुडपे असून स्वतःच्या जेसीबी मशीनद्वारे काढून नेण्यासाठी जाहीर लिलाव पध्दतीने विक्री करावयाचे आहे. तरी इच्छूक व्यक्तिने दि. **११-०१-२०२१ रोजी ठिक सकाळी १० वाजता** या कार्यालयास हजर रहावे.

**जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आसतील :**

१. सदरील जमिनीवरील बाभळीचे लहान झुडपे प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर पाहावयास मिळतील.
२. लिलावात भाग घेणा-या/ बोली बोलणा-या प्रत्येक व्यक्तिस रु. १,०००/- अनामत रक्कम जमा करावी लागेल. अनामत रक्कम जमा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. सदर अनामत रक्कम लिलाव संपल्यानंतर परत केली जाईल.
३. बोलीची किमंत कमी आहे असे वाटल्यास सदर बाभळीचे झुडपे यांचा फेर लिलाव करण्यात येईल किंवा अपेक्षेप्रमाणे न आल्यास सदरील बाभळीचे झुडपांचा लिलाव रद्य करणे इ. अधिकार संबधीत लिलाव अधिकारी अथवा कमिटीस राहतील. या शिवाय लिलाव अधिका-याचा / कमिटीचा निर्णय बंधनकारक राहील.
४. उच्चत्तम बोली बोलणा-यासच सदर बाभळीची झुडपे विकल्या जातील.
५. खरेदी करणा-यांनी खरेदीची रक्कम त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत जमा करुन रितसर पावती हस्तगत करणे आवश्यक आहे.
६. संपुर्ण रक्कम जमा केल्याशिवाय सदर बाभळीचे झुडपे घेऊन जाता येणार नाहीत.
७. खरेदी करणा-या व्यक्तिनेच खरेदी केलेल्या बाभळीचे झुडपे नेल्यानंतर परिसर स्वच्छ करुन दयावयाचा आहे.
८. खरेदी केलेली बाभळीचे झुडपे स्वतःच्या जेसीबाद्वारे काढून प्रक्षेत्रावरुन न्यावी लागतील नसता योग्यती कार्यवाही करण्यात येईल.
९. लिलाव प्रक्रियेसंबधी लिलाव समितीच्या अध्यक्षांचा निर्णय अंतिम ग्राहय धरण्यात येईल, लिलाव प्रक्रियेत भाग घेणा-यांनी याची नोंद घ्यावी.

जेष्ठ शास्त्रज्ञ
संकरित गो.पैदास प्रकल्प
व.ना.म.कृ.वि., परभणी

प्रत : १. मा. संचालक संशोधन, वनामकृवि, परभणी यांना माहितीस सादर.
२. प्रभारी अधिकारी, संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांच्या कार्यालयास वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापिठ, परभणी संकेत स्तरावर प्रसारणानासाठी.
३. मा. संचालक संशोधन, वनामकृवि, परभणी यांच्या कार्यालयाचा नोटीस बोर्डवर.